N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अमरावती ग्रामीण **P.S.(ठाणे):** तिवसा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0182 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 16/04/2026 02:11

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिंनाक पासून):** 01/04/2026
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 01/04/2026
**Time From (वेळेपासून):** 14:06 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:27 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 16/04/2026 **Time (वेळ):** 01:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 16/04/2026 01:59 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती तिवसा ,तिवसा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

पोलीस स्टेशन तिवसा अमरावती सत्यमेव जयते



6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सरतर्फे श्रीमती.निलिमा षालीग्राम सातव
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,अमरावती,गाडगे नगर,अमरावती शहर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,अमरावती,गाडगे नगर,अमरावती शहर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-8669000360

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.आषिश तुळषिदास दिंडेकर | | | 1. गुरुदेवनगर मोझरी ,तिवसा, तिवसा,अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
हकीकत - जबानी रिपोर्ट दि. 16/04/2026सरतर्फे:- श्रीमती.निलिमा षालीग्राम सातव, वय-38 वर्श, व्यवसाय - नोकरी, पद - पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग ,अमरावती. मो-8669000360.मी आज रोजी समक्ष ला.प्र.वि कार्यालय अमरावती येथे सरतर्फे फियाद देते की, मी वरील प्रमाणे ठिकाणी पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे.

दि.01/04/2026 रोजी मी ला.प्र.वि. अमरावती येथे कार्यालयात हजर असताना तक्रारदार विनोद रणजितसींग बंगरे, वय - 37, व्यवसाय -षेती, रा. मराठी जिल्हा परीशद षाळेजवळ कु-हा , यांनी फोनद्वारे तोंडी तक्रार सांगीतली की, तक्रारदार यांनी मागच्या वर्शी त्यांच्या आईच्या नावावर असलेल्या षेतात नविन विहीर करण्यासाठी कृशी विभागाच्या M.R.G.S योजनेअंर्तगत नविन विहीर मिळण्याकरीता संपुर्ण फाईल तयार करून ग्रामपंचायत कु-हा येथे दिली होती. त्यानंतर दिंनाक 27/03/2026 रोजी रोजगार सेवक सुरेष सपाटे यांनी कृशी विभागाचे श्री दिंडेकर साहेब (तिवसा) यांचे सांगण्यावरून तक्रारदार यांच्या षेतातील जागेचे जिओ टॅगींग केले व विहीरीचे पुढील मंजुरीचे कामकाज श्री.दिंडेकर साहेब करून देतील असे सांगितलेवरून तक्रारदार हे दिंनाक 29/03/2026 रोजी तिवसा पंचायत समिती येथे जावुन श्री दिंडेकर साहेब यांना भेटुन त्यांच्या विहीरीच्या कामाबददल विचारपुस केली असता त्यांनी तक्रारदार यांना म्हटले की, "तुमची विहीर मंजुर करून यादित नाव टाकण्यासाठी तुम्ही मला दहा हजार रूपये दया तरच तुमच नाव यादित येईल" तेव्हा तक्रारदार यांना विहीर खोदणे आवष्यक असल्यामुळे ़ त्यांची इच्छा नसतांनाही नाईलास्तव त्यांनी दहा हजार रूपये देतो असे म्हणुन तेथुन निघुन आले बाबत माहीती त्यांनी सांगीतली. त्यावरून आम्ही तत्काळ पषुसंवर्धन विभाग कार्यालय, जिल्हा परीशद अमरावती यांना पत्र देवुन 1)श्री. विनोद किसनराव सवई, वरीश्ठ सहायक 2)श्री. सुमित गोपीचंद गजबे, कनिश्ठ सहायक असे दोन सरकारी पंच ला.प्र.वि. कार्यालय अमरावती येथे बोलविले व त्यानंतर ला.प्र.वि. कार्यालयाचे आवारात उभे असलेले षासकिय वाहन क्रं. एमएच 27 बिव्ही 1568 ने आम्ही स्टाफ व षासकिय पंचासह पडताळणी व सापळा कार्यवाही करिता लागणारे आवष्यक साहित्य प्रिंटर, लॅपटॉप, व इतर साहित्य घेवुन तिवसा ता.जि. अमरावती येथे रवाना झालो. व तिवसा येथील जयश्री वानखडे सभागृहाजवळ तक्रारदार श्री.विनोद बंगरे यांना बोलाविले व सदर दोन सरकारी पंचांना तक्रारदार त्यांचा परिचय करुन दिला. त्यानंतर तक्रारदार यांनी आम्हा व पंचासमक्ष वरीलप्रमाणे हकीकत पुन्हा सांगीतली व कागदावर लिहुन तषी लेखी तक्रार आम्हास सादर केली. त्यावर पंच क्र.1 श्री.विनोद सवाई यांनी षेरा लिहुन दोन्ही पंचांनी तक्रारीवर सहया केल्या व समक्ष म्हणुन आम्ही सुध्दा सही केली व त्या संदर्भाने पडताळणी पुर्व पंचनाम्याची कार्यवाही करुन पडताळणी पुर्व पंचनामा करण्यात आला व लागलीच पडताळणी कार्यवाही करणेकरीता तक्रारदार यांचे जवळ व्हाईस रेकॉडर सुरु करुन देवुन त्यांना पंच क्र.1 श्री.सवाई यांचेसह पंचायत समिती तिवसा येथील कृशी विभागाचे श्री.दिंडेकर यांची भेट घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयामध्ये रवाना केले. थोडयाच वेळात ते परत आले.त्यानंतर आम्ही दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार श्री. विनोद बंगरे यांना पंच क्रं. 1 श्री विनोद सवई यांचेसह पचायत समिती तिवसा येथिल श्री दिंडेकर यांची भेट घेण्याकरीता पंचायत समिती तिवसा जि. अमरावती येथे रवाना केल्यापासुन परत येईपर्यंत काय हकीगत घडली, ती सर्वासमक्ष पंच क्र. 2. सुमित गजबे यांना सांगण्यास सांगीतली असता तक्रारदार श्री.बंगरे यांनी सांगीतले की, आम्ही केबिनमध्ये गेलो असता आलोसे श्री. दिंडेकर यांनी पंचाबाबत ईषारा करून विचारले व त्यांना बाहेर थांबायला सांगीतले त्याप्रमाणे पंच क्र. 1 श्री विनोद सवई हे बाहेर थांबले नंतर लोकसेवक श्री. दिंडेकर यांनी तक्रारदार यांना '' थोडोसा वेळ आहे नाव आल आहे़ कोटे़षन आल आहे टाकल आहे आम्ही वेळ लागान थोडुसा वेळ लागन थोडा वेळ लागन नोट षिट मंजुर नाही झाली ना बाकीच्याची मंजुर झाली आहे पंधरा लोक '' असे म्हटले असता, त्यावर तक्रारदार श्री बंगरे यांनी लोकसेवक यांना, '' ह........... असे म्हटले त्यावेळी लोकसेवक श्री दिंडेकर यांनी तक्रारदार यांना म्हटले की, "करून देतो मी ते करून देतो काही विशय नाही पण तुम्हच लोकेषन येवुन गेल ते महत्वाच आहे", त्यावर



Scanned with OKEN Scanner

तक्रारदार यांनी '' ह....असे म्हटले, त्यावर लोकसेवक श्री दिंडेकर यांनी त्यांना म्हटले की, '' हे आपल्या हातचच आहे ऑफलाईनच" त्यावर तक्रारदार श्री बंगरे यांनी म्हटले की, '' कस्टंबर च दिसुन राहील कमी जास्त करा देवुन देतो मी दोन तिन हजार रूपये.'', त्यावर लोकसेवक श्री दांडेकर यांनी त्यांना म्हटल की, " सात वाटत असन सात दया " असे म्हटले, त्यावर तक्रारदार श्री बंगरे यांनी म्हटले की, '' आ...'' त्यावर लोकसेवक श्री दिंडेकर यांनी म्हटले की, " सात वाटत असण त सात दया.. कसही देल त मी नाही म्हणत नाही.. काउन मी कधीच घेवो नाही." असे म्हटले असता, त्यावर तक्रारदार श्री बंगरे यांनी असे म्हटले की, " सात देतो सात" त्यावर लोकसेवक श्री दिंडेकर त्यांना म्हटले की, '' पाचही दिले तरी मी नाही, नाही म्हणनार मी कवुन हे पैसे जे आहे ते... कधिच घेवो नाही'' त्यावर तक्रारदार श्री बंगरे यांनी म्हटले की, '' पाचच देतो ना मग '' त्यावर लोकसेवक श्री दिंडेकर यांनी म्हटले की, " तुम्ही म्हणता त पाचच घेतो ना ते कस आहे ते इकडे दया लागते" असे म्हटले त्यावर लोकसेवक श्री बंगरे यांनी म्हटले की,'' ह... येतो मग आणतो मग '' त्यावर लोकसेवक यांनी त्यांना " ह... याना मग " असे बोलुन परत निघुन आले. तेव्हा पडताळणी कारवाई दरम्यान इतर लोकसेवक श्री.दिंडेकर यांनी लाच रक्कम मागीतल्याचे निश्पन्न झाल्याने लागलीच सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आल्याने तक्रारदार यांना लाचेची रक्कम 5,000/-रू हजर करण्यास सांगीतले असता त्यांनी 5,000/- रुपये ज्यामध्ये 500 रुपये दराच्या 10 नोटा हजर केल्या. त्या नोटांचे क्रमांक आम्ही पंच क्र.1 श्री.सवाई यांना वाचण्यास सांगुन पंच क्र.2 श्री. गजबे यांना को-या कागदावर क्रमांक लिहिण्यास लावले व त्यावर पंचांनी व आम्ही सहया केल्या. त्यांनतर आमच्या सुचनेवरून स्टाफ आषिश जांभोळे यांनी तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटाला अॅन्थ्रासीन पावडर लावुन प्रात्यक्षिक करून तसेच तक्रारदार व पंचाना अल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहीती दिली व सापळापुर्व पंचनामा करण्यात आला. त्यानंतर सापळा पंचनाम्यादरम्यान हजर केलेल्या लाच रक्कमेला अॅथ्रासिन पावडर लावुन लाच रक्कम तक्रारदार यांच्या फुलपॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवुन दिली. व पोकॉ.आषिश जांभोळे यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवून तक्रारदार व पंच क्र.1 श्री.सवाई यांना तक्रारदार यांच्या चारचाकी वाहनाने पंचायत समिती तिवसा येथील कृशी विभागाचे श्री.दिंडेकर यांची भेट घेण्याकरीता पंचायत समिती कार्यालय, तिवसा येथे रवाना केले.त्यानंतर आम्ही व सापळा पथकातील इतर अधिकारी व कर्मचारी हे वेगवेगळ्या वाहनाने रवाना होवुन पंचायत समिती कार्यालय तिवसा कार्यालयाच्या आजुबाजुला आडोसा घेवुन थांबले. तेव्हा तक्रारदार व पंच क्र.1 श्री.सवाई पंचायत समिती तिवसा कार्यालयात गेले व काही वेळातच कार्यालयाबाहेर आले व आम्ही उपस्थित असलेल्या ठिकाणी परत आले त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच क्रं. 1 श्री.सवाई यांना विचारणा केली असता तक्रारदार व पंच क्रं. 1 श्री. सवाई यांनी सर्वासमक्ष सांगितले की, पंचायत समिती तिवसा येथील कृशी विभागाचे श्री.दिंडेकर हे त्यांच्या कॅबीनमध्ये हजर नव्हते त्यामुळे आम्ही परत आलो. असे त्यांनी सांगितले. त्यावरून सापळा पंचनामा कार्यवाही करून पुन्हा दिंनाक 02/04/2026 रोजी सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यावरून दिंनाक 02/04/2026 रोजी पुन्हा सापळा कारवाई आजमविण्यात आली परंतु त्यावेळी सुध्दा इआलोसे श्री.दिंडेकर हे त्यांच्या कार्यालयात हजर नसल्याने सापळा कार्यवाही पुर्ण झाली नाही.तरी दिंनाक 15/04/2026 रोजी तक्रारदार श्री.बंगरे यांनी दोन्ही पंचासमक्ष निवेदन दिले की, इआलोसे श्री.दिंडेकर यांना माझेवर संषय आल्याने ते माझेकडून आता लाच रक्कम स्विकारणार नाहीत तरी श्री.दिंडेकर यांचेवर योग्य ती कारवाई करण्यात यावी. त्यावरून आम्ही, स्टाफ व दोन पंचासह तिवसा येथे जावुन इआलोसे श्री.दिंडेकर यांचा षोध घेवुन त्यांना ताब्यात घेतले. तरी दि. 01/04/2026 चे पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार श्री. विनोद रणजितसिंग बंगरे यांचे आईच्या नावावर असलेल्या 'शेतात नविन विहीर करण्यासाठी कृशी विभागाच्या M.R.E.G.S योजनेअंर्तगत नविन विहीर मिळण्याकरीता पंचायत समिती तिवसा येथील कृशी विभागाचे श्री.आषिश तुळषिदास दिंडेकर, वय 44 वर्शे,पद - तांत्रीक सहायक यांनी दहा हजार रूपयाची मागणी करून तडजोडीअंती 5,000/-रू. पंचासमक्ष मागितल्याचे निश्पन्न झाल्याने श्री.आषिश तुळषिदास दिंडेकर यांचे विरूध्द माझी कायदेषिर फियाद आहे.

माझी वरिल प्रमाणे फियाद लॅपटॉपवर टाईप केली असुन त्याची प्रिंट काढूण ती मी वाचुन पाहीली, माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी टाईप केली आहे. सही ( निलिमा सातव )पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय,अमरावती सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला



Scanned with OKEN Scanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
NITIN JAGDISH BAWRASIYA
**Rank** (पद): HC (Head Constable) **No.**(क्र.): 16101000362NJB
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): GOPAL Shivram UPA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN76180



Scanned with OKEN Scanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with OKEN Scanner